| MHKO170016262025 | **दिवाणी किरकोळ अर्ज ४९/२०२५**<br>**अनिता गायकवाड वगैरे ४**<br>**वि.**<br>**कोणीही नाही.** |
|---|---|

## निशाण १ खाली आदेश

१. अर्जदार क्र. १ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ८ (२) प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी केला आहे.

**अर्जदार क्र. १ ते ५ यांची अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे**

२. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ५ यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे म्हणणे असे की, अर्जदार हे पन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील कायम रहिवासी असून त्यांची पन्हाळा व देवाळे या ठिकाणी वडिलार्जित मालकीची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे दि. ०८/१२/१९९८ रोजी पन्हाळा, ता. पन्हाळा येथून राहते घरातून पाहुण्यांचे गावी जातो असे सांगून निघून गेलेले आहेत. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील पन्हाळा, ता. पन्हाळा येथून घरातून कोणालाही न सांगता निघून गेल्याने त्यांचे घरचे लोकांनी पै-पाहुणे, नातेवाईक यांचेकडे शोध घेतला तसेच ते घरी परत येतील याची खात्री असल्याने थोडे दिवस त्यांची घरी येण्याची त्यांनी वाट पाहिली परंतु ते घरी आले नाहीत. म्हणून अर्जदार यांनी दि. १३/०७/१९९९ रोजी पन्हाळा पोलीस स्टेशन येथे अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे मिसिंग झालेबाबत तक्रार दाखल केलेली होती. त्याचा पन्हाळा पोलीस स्टेशन कडील मिसिंग रजि. नं. ३/१९९९ असा आहे. तसेच अर्जदार यांचे पुर्वहक्कदार हे दि. ०८/१२/१९९८ रोजी राहते घरातून निघून गेल्यानंतर ते आजतागायत परत आलेले नाहीत. तसेच त्यांना आजअखेर गेली २७ वर्षात त्यांनी पहायला पाहिजे अशी कोणीही व्यक्तींनी त्यांना पाहिलेले नाही अथवा त्यांचेबाबत ते

हयात असल्याचे कोणीही ऐकलेले नाही. अर्जदार यांचे पुर्वहक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड यांना अर्जदार हेच हिंदू वारसा कायद्यातील तरतुदीनुसार वर्ग १ मधील सरळ व कायदेशीर वारस असून त्यांची आई पार्वती शंकरराव गायकवाड यासुद्धा मयत आहेत. तसेच अर्जदार यांचे पुर्वहक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड मिसिंग असल्याने त्यांचा गेली ७ वर्षापेक्षा अधिक काळ कोठेही ठावठिकाणा उपलब्ध झालेला नाही तसेच त्यांचे हयातीबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तसेच त्यांचा दिवाणी मृत्यू झालेला आहे असे गृहित धरून अर्जदार क्र. १ ते ५ हे त्यांचे वारस आहेत असे जाहीर करणे न्यायाचे व गरजेचे आहे.

३. अर्जदार यांचे पुर्वहक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे भारतीय सैन्य दलामध्ये नोकरी करत होते तसेच त्यांचे नावे देवाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या ठिकाणी खाते नं. २४८ गट नं. ३७८, ३८२, ३८३ या ७/१२ पत्रकी शेतजमीन मिळकती आहेत. परंतु अद्याप मयताचे नोकरीचे ठिकाणी अथवा जमीन मिळकतीस वारस नोंद झालेली नाही. तसेच अर्जदार यांचे पुर्वहक्कार हे मिसिंग झाल्याने तसेच गेली ७ वर्षापेक्षा अधिक काळ ते परागंदा असल्याने त्यांचे मृत्यूची नोंद शासकीय दप्तरी होवू शकत नाही या कारणास्तव अर्जदार यांना वारस नोंदी करणे अडचणीचे झाले आहे. तसेच अर्जदार यांनी अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड यांचे नोकरीचे ठिकाणी व जमिन मिळकतीस वारस नोंदीबाबत चौकशी केली असता त्यांनी अर्जदार यांना दि. ०६/११/२०२५ रोजी सदर कार्यालयाने अर्जदार हे सरळ वारस असल्याबाबतचा मे. कोर्टाचा वारसा दाखल्याची मागणी केली. त्यामुळे अर्जदार यांना सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. तसेच अर्जदार यांचे पुर्वहक्कदार हे भारतीय सैन्य दलात नोकरी करत होते त्यांचे शासकीय कागदोपत्री काही ठिकाणी अनंत व काही कागदोपत्री आनंदराव असे नाव नोंद झालेले आहे या दोन्ही नावाची व्यक्ती एकच म्हणजेच अर्जदार यांचे पुर्वहक्कदार असून अन्य कोणीही नाही. अंतिमतः अर्जदार क्र. १ ते ५ यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. अर्जदार क्र. १ ते ५ यांनी दैनिक नवसंदेश वृत्तपत्रात जाहीर नोटीस देवून तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करुन देखील आज अखेर सदर अर्जास कोणीही हरकतदार कोर्टासमोर हजर झालेला नाही.

५. अर्जदार क्र. १ ते ५ यांचा अर्ज, कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. अर्जदार तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे मुद्दे निर्णयार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित मी खालील प्रमाणे नोंदविले आहेत.

| **अनु क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वारसा दाखला मिळविणेस अर्जदार क्र. १ ते ५ हे पात्र व हक्कदार आहेत का ? | **होय.** |
| **२.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ :-**

६. अर्जदारांतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. १ ते ५ यांनी दैनिक नवसंदेश या वृत्तपत्रात जाहीर नोटीस देवून तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करुन देखील आज अखेर सदर अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही अगर अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस दाखला देणेस कोणीही विरोध दर्शविलेला नाही. तसेच अर्जदार क्र. २ यांनी या अर्जाचे पृष्ठयर्थ त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.९** येथे दाखल केले आहे. सबब त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेविषयी विनंती केली.

७. प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पन्हाळा पोलीस स्टेशनचा मिसिंग दाखला **(नि.१०)**, पन्हाळा पोलीस स्टेशनचा तपास सुरु असलेला दाखला **(नि.११)**, गट क्र. २४८ चा ८–अ चा उतारा **(नि.१२)**, गट क्र. ३८२ चा सातबारा उतारा **(नि.१३)**, गट क्र. ३७८ चा सातबारा उतारा **(नि.१४)**, गट

क्र. ३८३ चा सातबारा उतारा **(नि.१५)**, दैनिक नवसंदेश या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस **(नि.१६)** प्रसिद्ध करुन देखील या कामी कोणीही न्यायालयासमोर हजर होवून अर्जदार क्र. १ ते ५ यांनी दाखल केलेला अर्ज व अर्जदार क्र. १ ते ५ यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रास हरकत घेतलेली नाही. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार यांचे पूर्व हक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे दि. ०८/१२/१९९८ रोजी पासून परागंधा झालेले आहेत. तसेच अर्जदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही हजर होवून आपण अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड यांचे वारस आहोत असे न्यायालयासमोर सादर केलेले नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ५ यांचे व्यतिरिक्त अनंत उर्फ आनंदराव यांचे अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच अर्जदार हे हिंदू वारसा अधिनियम नुसार वर्ग-१ चे वारस असल्यामुळे ते प्रस्तुत दाखला मिळणेस पात्र आहेत, या निष्कर्षापर्यंत मी येत आहे.

८. अर्जदार यांनी दाखल केलेल्या **मोहमद अली मोहमद इस्लाम खान २००१ (४) ऑल. एम. आर. २९७** या न्यायनिर्णयामध्ये याचिकाकर्ता यांनी त्यांचे वडील मोहम्मद इस्माइल खान हे सात वर्षांहून अधिक काळापेक्षा दिसून न आल्यामुळे त्यांच्या मृत्यूबाबतचे हक्कज्ञापन मिळणेकरिता याचिका दाखल केली होती. सदर याचिकाकर्ता यांनी त्यांना वारसा प्रमाणपत्र हे त्यांची आई व बहीण तसेच ते स्वतः यांच्याकरिता मिळावेत या करिता विनंती केली होती. सदर न्यायनिर्णयामध्ये भारतीय पुरावा कायदा कलम १०८ नुसारचे मृत्यूबाबतचे गृहीत पुर्णपणे लागू होते. तसेच याचिकाकर्ता हे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता पात्र आहेत असा आदेश पारीत केलेला आहे. सदर न्यायनिर्णय प्रस्तुत प्रकरणात लागू होईल असे नम्रतापूर्वक वाटते.

९. तसेच अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज, अर्जदार यांचे प्रतिज्ञापत्र व अभिलेखावर दाखल कागदपत्रे तसेच वर नमूद कारणमिमांसा यांचा एकत्रीतरित्या विचार केला असता

सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त व न्यायोचित होईल. त्याप्रमाणे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष देणेकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

**१. अर्जदार क्र. १ ते ५ यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.**

**२. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ (२) अन्वये अर्जदार क्र.१ ते ५ यांचे नावे वारस दाखला देणेत यावा.**

**३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद क्र. ३१२ अन्वये वारस दाखले मध्ये तशी टीप ठेवण्यात यावी.**

18/3/26

दि. १८.०३.२०२६

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.